## प्रकरण ७ वे

## उपसंहार व कांही शिफारशी

प्रस्तुत प्रबंधामध्ये निपाणीतील सहकारी दूध संघाच्या कार्याचा अभ्यास केला आहे. संस्थेकडील कांही वर्षांच्या अहवालाच्या अभ्यास करून प्रस्तुत प्रबंधाचे विवेशण केले आहे कांही माहिती संघाचे सचिव, व इतर मान्यवर मंडळी यांच्याशी केलेल्या प्रत्यक्ष चर्चेतुन उपलब्ध झाली. प्रबंधाला आवश्यक असणारी सांख्यकिय माहिती, निपाणी नगरपालिका निपाणी दूरवाणी केंद्र शासकीय कचेरी, तसेच खाजगी डेअरी यांच्याकडून मिळविली.

प्रस्तुत विषय हा सहकारी दूध व्यवसायाला अनुसरून आहे. म्हणुन पहिल्या प्रकरणात सहकारी विपणन संस्थेची वैशिष्टे व भारतातील सहकारी दूग्ध धंदयाचा विकास कसा विकसित झाला आहे याचा अभ्यास केला आहे. भारताचा दूध उत्पादनात जगामध्ये तिसरा क्रमांक लागतो. म्हणुन दूध व्यवसायाचे महत्व जाणुन घेण्यासाठी निपाणीतील दूग्ध विकास कसा झाला यांचा आभ्यास केला आहे.

निपाणी हे सीमा भागातील एक महत्वाचे शहर आहे. सहकारी दूध संस्थाचा विकास कर्नाटक व महाराष्ट्र या दोन्ही राज्यात संयुक्तरिता झाला आहे. निपाणी या भागातील बरेचसे दूध महाराष्ट्रात पाठविले जाते. तसेच हा संघ महाराष्ट्रातील कांही गांवातुन दूध संकलन करीत आहे.

या संघाने केलेली कामगिरी संघांची स्थापना, संघ स्थापण्या पाठीमागची उद्दिष्टे संघाचे सभासदत्व संघाचे भांडवल संघाची कर्जे

संघाची गुंतवणुक , मालमत्ता, राखीवनिधी एकुण उत्पन्न व संघाचा नफा संघाचे दूध संकलन व वितरण या सर्वांचा अभ्यास या प्रबंधात करण्यात आला आहे. त्या आनुषंगाने कांही निष्कर्ष पुढे दिले आहेत.

निपाणी शहराची १९९१ च्या शिरगणती नुसार असलेली लोकसंख्या ५१६८० आहे. व या संघाचे स्थानिक विक्री होणारे दूध हे फक्त ४०० लिटर एवढेच आहे. म्हणजे या संघाचे स्थानिक विक्री होणारे दूध अत्यंत कमी आहे.

दूध संघाने अजुन ग्रामीण भागामध्ये प्राथमिक सहकारी दूध संस्था पुर्णपणे उभ्या केल्या नाहीत. अजुनही कांही गावात सहकारी दूध संस्था आस्तित्वात नाहीत.

निपाणीमध्ये अद्यापही सहकारी दूध विक्री व्यवस्था कार्यक्षम नाही. बरेच ग्राहक खाजगी दूध डेअरीमधुन दूध खरेदी करतात.

संघाने फक्त घाऊक प्रमाणात दूधाची खरेदी व घाऊक प्रमाणात विक्री एवढाच मर्यादित दृष्टीकोन ठेवला आहे. त्यामुळे ग्राहकांच्या दुग्ध व्यवसायाबद्दल असलेल्या मागणीचा विचार या संघाने केला नाही.

संघाने संकरित गाई व म्हैशींचा पुरवठा मोठया प्रमाणात अजुनही केला नाही.

विकण्यायोग्य दूध कसे निर्माण करता येते किंवा त्यांची काय गरज आहे या विषयीचे ज्ञान या संघाने सभासदांना पटवून दिलेले नाही.

सहकारी दुग्ध विकास व निपाणी मधील दूध धंदयाचा विकास याचा अभ्यास केल्यानंतर निपाणीतील सहकारी दूध व्यवसायाला

अनुसरुन कांही शिफारशी पुढील प्रमाणे केल्या आहेत.

निपाणी शहरामध्ये ठिक ठिकाणी विक्री केंद्रे उघडून त्यांच्या मार्फत दूधाची विक्री करावी त्यादृष्टीने संघाने प्रयत्न केले असता ग्राहकाना चांगल्या प्रतीचे दूध मिळेल.

निपाणी भागामध्ये अजुनही दूध पुरवठा वाढविण्यासाठी कांही सुधारणा करणे क्रमप्राप्त ठरते. निपाणीच्या दक्षिणेकडील जी खेडी आहेत ती खेडी पुर्णता: कोरडवाहु जमीनीचे क्षेत्र लाभलेली खेडी आहेत. या भागातील दूध धंदा वाढविण्यास संधी आहे. दूध वाढल्यामुळे संघाला मोठा दूध प्रकल्प उभारता येईल. आणि कोरडवाहु शेती क्षेत्रातील लोकाना पर्यायी उत्पन्नाचे साधन मिळेल.

कर्नाटक शासनाने सहकारी दूग्ध धंदा विकसित करण्याच्या उद्देशाने विधायक पाऊले उचलावीत. त्यासाठी कांही उपक्रम राबविले पाहिजेत. जसे अर्थसहाय्य, आधुनिक जातीची पैदास किंवा इतर अनुशंगिक सेवा पुरविणे इत्यादी यामुळे दूग्ध धंदयाचा विकास होईल. लाभार्थी आणि परिसराचा विकास साध्य होईल.

=0=0=0=0=0=0=
=0=
=

# * संदर्भ सूची *

1. Dr. Kulandai Swamy. -"Co-operative Dairing in India," Rainbow Publication Coimbatore Page: 96.

2. Sami Uddin & Mahfeezar Rahman, "Co-operative Sectors in India " Published by S.Chand & Company Ltd. Ramnagar, NEW DELHI. 110 055.

3. Dairying in India, XX Dairy Industry Conference Issue, IDA Calcutta, 1989.

महाराष्ट्र दुग्ध व्यवसाय अंतरंग १९९२,
डेअरी पब्लिकेशन, महाराष्ट्र,
१०५/२४, मुंबई समाचार मार्ग, फोर्ट ,
मुंबई, ४०० ००१.

x x x x x x x x x x x x
x x x x x x x
x x x
x